टो. नं. १०३२१५१६०००१२२८
८/७/२०१६

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८.

(यापुढील पत्र व्यवहारात खालील क्रमांक व दिनांक यांचा उल्लेख करावा.)

(जागेच्या वा इमारतीच्या कायदेशीर मालकी हक्काचे संदर्भ लक्षात न घेता अर्जदारास हे संमतीपत्र देण्यात येत आहे.)

(कमेन्समेंट सर्टिफिकेट)

## बांधकाम चालू करणेकरिता दाखला

**सदर बांधकाम चालू करण्याचा दाखला आणि बांधकामाचे संमतीपत्र महाराष्ट्र प्रादेशिक य नगररचना अधिनियम, १९६६ ची कलम ४५ यातील तरतुदीप्रमाणे आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलमे (सेक्शन्स) २५३ व २५४ यातील तरतुदीप्रमाणे खालील अटींवर देण्यात येत आहे.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.
क्रमांक – बी. पी. /दिघी/ ५७ /२०१६
दिनांक : २५/ ०५ / २०१६

श्री / ~~श्रीमती / मे.~~ श्री. चंद्रकांत महादेव शिंदे व इतर तिन

द्वारा : ला. आ. / ला. स. श्री. दिपक डी. चव्हाण

पत्ता : श्रध्दा हेरिटेज बिल्डींग नं. डी-५ फ्लॅट नं. द-१+२ मोरवाडी पिंपरी पुणे-१८ यांना

पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांजकडून

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलमे ४५ आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलमे (सेक्शन्स) २५३ व २५४ अन्वये पिंपरी–चिंचवड महानगरपालिकेच्या सीमेतील मौजे – दिघी येथील सर्व्हे नं. १८/१/१ पैकी सिटी सर्व्हे नं. —— प्लॉट नं. —— मधील बांधकाम करण्यासाठी तुम्ही महानगरपालिकेला हा अर्ज दाखल केला तो दिनांक ०८ / ०१ / २०१६ रोजी प्राप्त झाला. त्यावरून बांधकाम करण्यास खाली लिहिलेल्या अटींवर व जादा अट क्र. —— ते —— नुसार तुम्हास संनतीपत्र देण्यात येत आहे.

१) सोबतच्या नकाशात दाखविल्याप्रमाणे काम केले पाहिजे.

२) संकल्पित बांधकाम रस्त्याच्या प्रमाण रेषेत येत असल्यास महानगरपालिकेचे अधिकारी सांगतील त्या वेळी सदर काम स्वखर्चाने आणि बिनतक्रार काढून टाकले पाहिजे.

३) जोत्यापर्यंत काम आल्यानंतर सेट–बॅक नगर नगररचना विकास विभागाकडून तपासून घ्यावेत. त्याशिवाय जो त्यावरील काम सुरू करू नये.

४) सोबतच्या नकाशावर मागे लिहिलेल्या / अटींवर हे संमतीपत्र देण्यात येत आहे.

५) ज्या प्लॉटवर नवीन इमारत बांधकाम करण्यात आले आहे. त्या इमारतीचे कंप्लीशन सर्टिफिकेट मागण्यापूर्वी प्रत्येक मालकाने इमारतीसमोर कंपाउंट वॉलच्या आत व बाहेर झाडे लावून ती व्यवस्थित वाढविण्याच्या दृष्टीने योग्य ती व्यवस्था, खबरदारी घ्यावी त्याशिवाय कंप्लीशन सर्टिफिकेट मिळणार नाही. रस्त्यावरील झाडांना जरूर ते संरक्षण कुंपण अर्जदाराने करावयाचे आहे. तसेच महानगरपालिकेच्या प्रचलित नियमानुसार योग्य ती अनामत रक्कम कोषागारात भरणे बंधनकारक आहे.

६) इमारतीचे कंप्लीशन सर्टिफिकेट देतांना रस्त्यावरील व आतील बाजूस टाकण्यात आलेले इमारतीचा राडारोडा उचलून जागा साफ केल्याशिवाय अर्जाचा विचार केला जाणार नाही.

७) नवीन बांधकाम सुरू करताना संबंधित जागेमध्ये झाडे असल्यास ती ट्री ॲथॉरिटीची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय तोडू नयेत अन्यथा कायदेशीर कारवाई करण्यात येते, याची नोंद घ्यावी.

८) आपण संबंधित बांधकाम हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतुदीचा भंग करून सक्षम अधिकाऱ्याची पूर्व परवानगी न घेता सुरु केल्याबद्दल / तसेच इकडील मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम न करता त्यात बदल व फेरफार करून या बांधकामाचे सुधारित नकाशास पूर्व परवानगी न घेता बांधकाम केल्याबद्दल, इमारतीचे भोगवटा पत्रक न घेता भोगवटा केल्याबद्दल आपणाविरूद्ध वरील नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करण्याचा पिं.चिं.म.न.पा. चा हक्क राखून ठेवला आहे.

९) बांधकाम साहित्य अथवा जुन्या बांधकामाचा निघालेला राडारोडा सार्वजनिक रस्त्यावर म.न.पा.चे परवानगी शिवाय ठेवता येणार नाही जर हे साहित्य सार्वजनिक ठेवल्याचे आढळल्यास त्यासाठी सुधारित विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार निवासी वापरासाठी रु. २५/– वाणिज्य वापरासाठी रु. ५०/– प्रति चौ. मी. प्रमाणे प्रति सप्ताहासाठी दंड आकारण्यात येईल.

१०) आपल्या इमारतीचे सांडपाणी नलिका म.न.पा. ड्रेनेज नलिकेला मालकाने स्वखर्चाने जोडणे आवश्यक आहे.